# बृहन्मुंबई महानगरपालिका
# जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील **महानगरपालिका चिटणीस हयांच्या कार्यालयाच्या** आस्थापनेवर (रु. ७५००-२०२०० अधिक ग्रेड पे रु. २४००/- अधिक अनुज्ञेय भत्ते) ह्या वेतनश्रेणीतील 'कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी)' आणि 'कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी)' हया संवर्गातील प्रवर्गनिहाय रिक्त असलेली पदे तसेच संभाव्य रिक्त होणारी पदे भरण्यासाठी पुढे नमूद केलेल्या विहित अर्हता धारण करणाऱ्या आणि अटींची पूर्तता करणाऱ्या मागासवर्गीय/खुल्या प्रवर्गातील इच्छूक उमेदवारांकडून सरळ सेवा भरतीसाठी विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत :-

**आरक्षणानुसार रिक्त पदे** :-

| अ.क्र. | पदनाम | एकूण रिक्त पदे | अनुशेषांतर्गत रिक्त पदे | | | | | | | | खुला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | |
| १. | कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी) | ७ | १ | १ | १ | - | - | - | २ | - | २ |
| २. | कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी) | १४ | १ | २ | - | १ | १ | - | ३ | १ | ५ |

सेवेतील नियुक्तीसाठी ५२% सामाजिक आरक्षणाव्यतिरिक्त सदर नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे -

★ शासन आदेशानुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना ५% आरक्षण ठेवण्यात येईल.

★ शासन आदेशानुसार माजी सैनिकांसाठी १५% आरक्षण ठेवण्यात येईल.

★ शासन आदेशानुसार महिलांसाठी ३०% आरक्षण ठेवण्यात येईल.

★ शासन आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांकरिता ५% आणि भूकंपग्रस्तांकरिता २% आणि आरक्षण ठेवण्यात येईल.

★ शासन आदेशानुसार सुशिक्षित बेरोजगारांना १०% आरक्षण.

- भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांची संख्या, आरक्षण / अनुशेष हयामध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे, तसेच, प्रवर्गनिहाय पदसंख्या बदलण्याचे अधिकार, तसेच भरतीप्रक्रिया कोणत्याही वेळी पूर्वसुचना न देता स्थगित करणे, अंशत:/पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने महानगरपालिका चिटणीस हयांना राहतील व ह्याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही अथवा कोणताही दावा करता येणार नाही.
- प्रकल्पग्रस्तांसाठी सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचा दि. ०३.०४.२००८ चा ठराव क्र. १० अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्त्वे ह्यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

...२...

- अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.
- सदर भरतीच्या नियम / निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना / निर्णय / परिपत्रकानुसार बदल झाल्यास त्या त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकारक राहील.

**(अ) शैक्षणिक अर्हता** :-

अर्ज करतेवेळीच उमेदवाराने पदनिहाय अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**१) कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी) :**

(१) उमेदवार माध्यमिक शालान्त परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(२) उमेदवाराने माध्यमिक शालान्त किंवा तत्सम परीक्षा प्रत्येकी १०० गुणांचे मराठी व इंग्रजी हे विषय घेतलेले असावेत.

(३) इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी लघुलेखन ८० शब्द प्रति मिनिट हया गतीची शासकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर पदावर निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि मराठी लघुलेखन ८० शब्द प्रति मिनिट हया गतीची शासकीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यास पुढील पदोन्नतीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

(४) उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च व तांत्रिक शिक्षण मंडळाचा MSCIT परीक्षा प्रमाणपत्रधारक असावा. तथापि, अर्ज सादर करताना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून २ वर्षांच्या आत शासनाने विहित केलेली MSCIT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा, कोणतेही कारण न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**२) कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी) :**

(१) उमेदवार माध्यमिक शालान्त परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(२) उमेदवाराने माध्यमिक शालान्त किंवा तत्सम परीक्षा प्रत्येकी १०० गुणांचे मराठी व इंग्रजी हे विषय घेतलेले असावेत.

(३) मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि मराठी लघुलेखन ८० शब्द प्रति मिनिट हया गतीची शासकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर पदावर निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी लघुलेखन ८० शब्द प्रति मिनिट हया गतीची शासकीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यास पुढील पदोन्नतीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

(४) उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च व तांत्रिक शिक्षण मंडळाचा MSCIT परीक्षा प्रमाणपत्रधारक असावा. तथापि, अर्ज सादर करताना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून २ वर्षांच्या आत शासनाने विहित केलेली MSCIT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा, कोणतेही कारण न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

...३...

**(ब) वयोमर्यादा** :-

(१) मागास प्रवर्गासाठी उमेदवाराचे वय दि. २२ डिसेंबर २०१५ रोजी १८ ते ३८ वर्षे दरम्यान आणि खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३३ वर्षे दरम्यान असावे.

(२) माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात किमान सहा महिने सेवा केलेल्या माजी सैनिकांनी सशस्त्र दलात केलेल्या अखंड सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे एवढा कालावधी त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

(३) तसेच शासन निर्णय क्र. निवक-१०१०/प्र. क्र. ०८/२०१०/१६-अ दि. ०६ ऑक्टोबर २०१० नुसार (अ) स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, (ब) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, (क) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, (ड) प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवार व (इ) अपंग उमेदवार या घटकांतील उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केलेली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.

(४) शासन निर्णयानुसार अत्युच्चम गुवत्ताधारक खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता सदर पदासाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

(५) सुशिक्षित बेरोजगार या आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती:-**

(अ) सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करीत असलेल्या पात्र उमेदवारांची कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी) हया संवर्गासाठी इंग्रजी लघुलेखनाची ८० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाची ४० श.प्र.मि. वेगाची आणि कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी) हया संवर्गासाठी मराठी लघुलेखनाची ८० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखनाची ३० श.प्र.मि. वेगाची **व्यावसायिक चाचणी संगणकावर घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.**

उपरोक्त निकषांनुसार आवश्यक त्या रिक्त पदांइतके उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष व निवडीची कार्यपद्धती शिथिल करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने महानगरपालिका चिटणीसांना राहतील. आवश्यक त्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध झाल्यास ही बाब बंधनकारक राहणार नाही. तसेच ह्यासंदर्भात कोणताही वाद व न्यायालयीन प्रकरण उमेदवारांस उपस्थित करता येणार नाही. व्यावसायिक चाचणी परीक्षा व मुलाखत कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे केवळ व्यावसायिक चाचणी व मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे निवडीबाबतचे हक्क राहणार नाहीत. नियुक्तीपूर्वी, मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, जन्मतारखेबाबतचा पुरावा, जात प्रमाणपत्र, उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र व व्यावसायिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे (टंकलेखन / लघुलेखन) इत्यादी मूळ प्रमाणपत्रे छाननीकरिता दाखविणे बंधनकारक राहील.

**सर्वसाधारण अटी** :-

१) रिक्त पदांची उपलब्धता आणि आवश्यकता हयानुसार नेमणुका केल्या जातील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेऊन रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार महानगरपालिका चिटणिसांना आहेत.

...४...

२) उमेदवाराने अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील स्वत:च्या छायाचित्रावर स्वाक्षरी करुन अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. तसेच सदर छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

३) उमेदवार सरकारी / निमसरकारी अथवा खाजगी नोकरीत असल्यास त्याने/तिने संबंधित प्रशासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

४) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

५) इतर राज्यांतून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

६) उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

७) (अ) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, व्यावसायिक अर्हता (इंग्रजी व मराठी टंकलेखनाची शासनाची प्रमाणपत्रे, मराठी व इंग्रजी लघुलेखनाची शासनकीय प्रमाणपत्रे) संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र असल्यास जात वैधता प्रमाणपत्र इत्यादि प्रमाणपत्रांच्या छायांकित व प्रमाणित केलेल्या सत्य प्रती (Attested)अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८) (ब) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

(क) उमेदवार माजी सैनिक असल्यास विमुक्त प्रमाणपत्र / प्रकल्पग्रस्त असल्यास (मुंबई महानगरपलिका प्रकल्प अंतर्गत बाधित) सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

(ड) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाति प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत उत्पन्न गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या नवीनतम (latest) प्रमाणपत्राची (Non Creamy Layer Certificate) साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अर्ज सादर करताना सदर प्रमाणपत्र नसल्यास ते मिळविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने अर्ज स्वीकारल्याची पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही. शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (अ) ह्यांजसाठीचे आरक्षण नव्याने लागू झाले असून, जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबतचा शासन निर्णय दि. १५/०७/२०१४ रोजी निर्गमित झालेला आहे. ह्यास्तव सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र आणि उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राशिवाय सध्या अर्ज करता येईल. तथापि सदर उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(इ) महिला आरक्षणांतर्गत खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांची त्या प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करताना सदर प्रमाणपत्र नसल्यास ते मिळविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने अर्ज स्वीकारल्याची पावती

...५...

अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

(फ) खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशांनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(ज) अपंग उमेदवाराने किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या व त्यावर उमेदवाराचा फोटो असलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच निवड झालेल्या अपंग उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकिय मंडळाकडे पाठविले जाईल व त्यांना शारीरिकदृष्ट्या पात्र (Fit) ठरविल्यानुतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

(ह)उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे

(य) सुशिक्षित बेरोजगार आरक्षणांतर्गत 'सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी म्हणून ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवारांना अर्ज करता येईल तथापि सदर नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केल्याचा पुरावा संबंधित रोजगार मार्गदर्शन केंद्राकडून प्राप्त करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी /न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील अर्जातील संबंधित परिच्छेदात देणे आवश्यक आहे.

१०) निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्थानकाकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

११) निवड झालेल्या उमेदवारांची सेवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही प्रभाग समिति कार्यालयात बदलीयोग्य असेल. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर बृहन्मुंबई महानगरपलिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपलिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना पदाकरिता निश्चित केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात येईल व सुधारित धोरणानुसार निश्चित केलेल्या सेवेच्या अटी व शर्ती लागू राहतील.

१३) निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्ववात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम (१९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१४) सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल आणि तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवारांच्या परिवीक्षाधीन कालावधीमधील कामगिरीवर अवलंबून असेल.

१५) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ .ज.(क), भ .ज.(ड) हया प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

...६...

१६) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १२ डिसेंबर २०११ च्या क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब च्या परिपत्रकानुसार, मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपले जातप्रमाणपत्र वैधता सादर करणे बंधनकारक राहील. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१७) उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराने सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१९) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. प्रअंक-१०१०/७१७/प्र. क्र. ३२२/१०/१६-अ दि. २६.०८.२०१० अन्वये एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवाराला समांतर आरक्षणाचा पुन्हा लाभ घेता येणार नाही.

२०) उमेदवाराने दि. २८.०३.२००५ ची शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२००० प्र.क्र. १७/२०००/१२ व दि. ०१.०७.२००५ व त्या अनुषंगाने शासन परिपत्रकान्वये लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदारानेसुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही, असा शेरा नमूद करावा.)

२१) प्रशासकीय किंवा अन्य कारणात्सव सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका चिटणीस यांना आहेत.

२२) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत करण्यात येईल.

२३) खेळाडूंनी शासन निर्णय क्र. ३०.०४.२००५ व तदनंतर सुधारित निर्णयानुसार गट 'क' साठी नमूद केलेली क्रीडाविषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र, संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले असावेत. ते प्रमाणपत्र विधीग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२४) अपंग उमेदवारांसाठी कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी) वा कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी) पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारीरिक क्षमता/पात्रता खाली नमूद केलेल्या तक्त्यानुसार आहे.

| पदनाम | कर्तव्य/जबाबदारी | अपेक्षित शारीरिक क्षमता/पात्रता |
|---|---|---|
| कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी)<br>कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी) | लघुलेखनाचे कामकाज व मराठी, इंग्रजी टंकलेखन करणे. | S (बसणे), ST (उभे राहणे), W (चालणे), RW (वाचणे- लिहिणे) C (संवाद साधणे), SE(पाहणे), H(ऐकणे), L (उचलणे), MF (बोटांची हालचाल करणे). |

...७...

२५) अपंग उमेदवारांना लेखनिक आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची शैक्षणिक पात्रता, पदास आवश्यक शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावी. तसेच लेखनिक आवश्यक असल्याबाबतची लेखनिकाची शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, ओळखपत्र इ. बाबतचा तपशिलासह लेखी स्वरुपात स्वतंत्र देणे बंधनकारक राहील. ऐनवेळी लेखनिकाची परवानगी देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२६) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिका चिटणीस कार्यालयाची राहणार नाही.

२७) टपालाद्वारे पाठविलेले तथापि विहित मुदतीत अर्ज स्वीकारण्याच्या ठिकाणी प्राप्त न झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अथवा त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही / केला जाणार नाही.

२८) आवश्यकतेनुसार उमेदवारांची व्यावसायिक चाचणीनंतर मुलाखत, कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्यांना गुणांच्या आधारे निवडीबाबतचे हक्क राहणार नाहीत. नियुक्तीपूर्वी शैक्षणिक अर्हता / प्रमाणपत्रे, जन्मतारखेबाबतचा पुरावा अधिवास प्रमाणपत्र , उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, वयाच्या शिथिलक्षम अटीच्या लाभाबाबतचे प्रमाणपत्र, समांतर आरक्षणासंबंधीत आवश्यक प्रमाणपत्रे इत्यादींची छाननी करण्यात येईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्र दाखविणेही बंधनकारक राहील. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास किंवा खोटी माहिती दिलेली आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

२९) टपाल खात्याच्या विलंबामुळे कोणतीही माहिती कळविण्यास किंवा अन्य काही कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महानगरपालिका चिटणीस हयांच्या कार्यालयावर राहणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही, अथवा कोणताही वाद व न्यायालयीन प्रकरण उमेदवारांस उपस्थित करता येणार नाही.

३०) निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी त्याला / तिला सदर पदाच्या एका महिन्याच्या वेतनाइतकी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे करारपत्र करावे लागेल.

३१) उमेदवार कोणत्याही संस्थेमध्ये कार्यरत असेल व निवड प्रक्रियेमध्ये अशा उमेदवाराची निवड झाली तर त्याने नियुक्तीपूर्वी संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र व बंधमुक्त प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने खोटी व चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल ठरविण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

३३) निवडप्रक्रियेच्या कोणत्याहि टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताहि पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच, सदर पदांच्या भरतीबाबत प्रशासनाचा निर्णय अंतिम असून त्याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर केला जाणार नाही.

...८...

३४) निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने महानगरपालिका चिटणिसांना राहतील.

३५) अर्जदाराने वारंवार अर्जाच्या / भरतीबाबतच्या चौकशीसाठी कार्यालयात येऊ नये.

३६) सोबतच्या नमूना अर्जाची प्रत काढून भरलेले अर्ज महानगरपालिकेच्या मुख्यालयातील महानगरपालिका चिटणीस कार्यालयात विहित कालावधीत सादर करावेत. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे व A-4 आकारातील असावेत. अर्ज विहित नमुन्यात, स्वहस्ताक्षरात व मराठी भाषेत आणि सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोडसह) सुस्पष्ट, पूर्ण व व्यवस्थित असावा. अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक असून जी बाब उमेदवारास लागू नसेल तेथे 'लागू नाही' असे नमूद करावे. अर्जदाराने पदाचे नाव व त्याचा प्रवर्ग न चुकता नमूद करावा. अर्जदाराने ज्या पदासाठी व प्रवर्गासाठी अर्ज केलेला असेल त्याच प्रवर्गाकरिता अर्जदाराचा विचार करण्यात येईल. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

**खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील:-**

१ विहित नमुन्यात व मराठी भाषेत नसलेले अर्ज.

२ फोटोवर स्वाक्षरी नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

३ विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.

४ विहित पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

५ स्वहस्ताक्षरात नसलेले व मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.

6 आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रती न जोडलेले अर्ज.

**विशेष सूचना** :-

१) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्ती हक्क प्राप्त झाला असे नाही, याची नोंद घ्यावी.

२) हयापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही हयाची कृपया नोंद घ्यावी.

३) सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेले उमेदवार ह्या पदांकरिता अर्ज करु इच्छित असल्यास सदर ठिकाणी नोंद केलेल्या उचित पुराव्यासह जाहिरातीनुसार अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

४) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

५) मध्यस्थ / ठक / बृहन्मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती हयांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनांपासून सावध राहावे.

...९...

६) व्यावसायिक चाचणी परीक्षा व मुलाखतीस उमेदवारास कळविल्यानुसार नमूद केलेल्या दिवशीच व वेळेतच उपस्थित राहावे लागेल. त्यानंतर उपस्थित उमेदवारांना परीक्षेची वा मुलाखतीची वेगळी संधी देण्यात येणार नाही.

७) उमेदवारांना प्रमाणपत्रे पडताळणी, व्यावसायिक चाचणी परीक्षा, मुलाखत ह्याबाबत तपशिल टपालाद्वारे कळविण्यात येईल.

८) उमेदवार वेगवेगळया पदांसाठी स्वतंत्र अर्ज करु शकतात. परंतु, वेगवेगळया प्रवर्गासाठी स्वतंत्र अर्ज करु शकत नाही.

**अर्ज सादर करण्याची पध्दत** :- विहित अर्हता धारण करणा-या आणि अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांनी आपले अर्ज बंद लिफाफ्यामध्ये, लिफाफ्यावर स्वत:चे संपूर्ण नाव व पत्ता, अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहून रेखांकित करुन शनिवार, दि. ९ जानेवारी २०१६ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत महानगरपालिका चिटणीस हयांचे कार्यालय, खोली क्रमांक १००, पहिला मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ हया पत्त्यावर आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह साध्या टपालाद्वारे (By Ordinary Post) पाठवावेत किंवा व्यक्तिश: कार्यालयात आणून द्यावेत.

**सही/-**
**महानगरपालिका चिटणीस**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**मुंबई - ४०० ००१.**

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

**वैयक्तिक माहितीपत्र**

<u>ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नांव-</u>

<u>प्रवर्ग</u>-

| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून छायाचित्रावर स्वाक्षरी करावी. 2.5 सें. मी x 3 सें.मी. |
|---|

दिनांक ----/----/२०१५ च्या जाहीरातीला अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील महानगरपालिका चिटणिसांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील ---------------------------- हया पदाकरिता मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे. माझी सविस्तर माहिति पुढीलप्रमाणे आहे :-

१) (अ) उमेदवाराचे संपूर्ण नांव (आडनाव प्रथम)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(ब) वडिलांचे / पतीचे नांव

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(क) विवाहित महिलांचे विवाहापूर्वीचे नांव

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

२) पत्ता (कायमचा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | पी | न | को | ड | क्र | मां | क | | | | | | |

३) पत्ता (पत्रव्यवहाराचा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | पी | न | को | ड | क्र | मां | क | | | | | | |

लागू असलेल्या रकान्यात ( √ ) अशी खूण करावी.

४) लिंग ☐ ☐

पुरुष स्त्री

५) (अ) उमेदवार सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छितो का ? : होय / नाही.

होय असल्यास आपण कोणत्या प्रवर्गाकरिता अर्ज केला आहे.

| अजा | अज | विजा(अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

जात : ------------------------------------------------ पोटजात : ------------------------------------------------

(ब) समांतर आरक्षण महिला ☐ माजी सैनिक ☐ प्रकल्पग्रस्त ☐

भुकंपग्रस्त ☐ अपंग ☐ खेळाडू ☐

सुशिक्षित बेरोजगार ☐

(क) समांतर आरक्षणांतर्गत आवश्यक ते प्रमाणपत्र जोडले आहे का ? आहे / नाही.

(ड) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र आहे / नाही.

(इ)जात वैधता प्रमाणपत्र आहे / नाही.

६) उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार

(अ) अंध / क्षीणदृष्टी ☐

(ब) श्रवण शक्तीतील दोष ☐

(क) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू ☐

७) अ) जन्मदिनांक :-

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय ___________ वर्षे ___________ महिने ___________ दिवस

८) **(अ)** शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | शालान्त परीक्षा मंडळाचे नाव | शालान्त परीक्षेतील गुण | | | | शालान्त परीक्षा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण (पैकी) | प्राप्त झालेले गुण | | | टक्केवारी | प्रयत्न (attempt) |
| | | | एकूण | मराठी | इंग्रजी | | |
| माध्यमिक शालांन्त परिक्षा किंवा तत्सम | | | | | | | |

**(ब)** :

(अ) फक्त 'कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (इंग्रजी)' हया संवर्गासाठी

इंग्रजी टंकलेखनाची गती : ----------------- श. प्र. मि.

इंग्रजी लघुलेखनाची गती : ----------------- श. प्र. मि.

संगणकीय ज्ञान (एम.एस. सी. आय. टी.) : -------------------------

(ब) फक्त 'कनिष्ठ लघुलेखक-नि-वृत्तनिवेदक (मराठी)' हया संवर्गासाठी

मराठी टंकलेखनाची गती : ----------------- श. प्र. मि.

मराठी लघुलेखनाची गती : ----------------- श. प्र. मि.

संगणकीय ज्ञान (एम. एस. सी. आय. टी.) : -------------------------
-

**(ड)** : इतर

९) (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? : -----------------------------------

(ब) झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. : -----------------------------------

१०) (अ) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? : -----------------------------------

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. : -----------------------------------

११) (अ) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का ? : -----------------------------------

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. -----------------------------------

१२) उमेदवार रहात असलेल्या ठिकाणी स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता: : -----------------------------------

मी असे प्रमाणित करतो / करते की, प्रस्तुत पदाची जाहिरात / अधिसूचना वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे व ती मला मान्य आहे. तसेच मी, हयान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, ह्या अर्जात दिलेली माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास, तसेच, उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

**दिनांक** : ---------------- अर्जदाराची सही/- -------------------------

**स्थळ:** ------------------- ( अर्जदाराचे नाव ) ------------------------

**सोबत :- प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती.**

१)-------------------------------------

२)-------------------------------------

३)-------------------------------------

४)-------------------------------------

**<u>अटी व शर्ती</u>**

१. उमेदवारास ठराविक नमुन्यात नमूद केलेली शपथ ग्रहण करावी लागेल.

२. त्याने राहण्याचे मुळ गाव दिले पाहिजे.

३. त्याने महानगरपालिका चिटणीस कार्यालयास अथवा संबंधीत अधिका-यास एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय नोकरी सोडून जाता कामा नये जर उपरोक्त प्रमाणे आगाऊ नोटीस न दिल्याचे आढळून आले तर त्याला एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम भरावी लागेल अथवा त्याच्या जमीन जुमल्याचे मिळकतीमधून वसूल करण्यात येईल.

४. संबंधित पोलीस ठाण्याचे वर्तणुकीबद्दलचे दाखले सादर केले पाहिजेत.

५. त्यांची नेमणूक एम.एम.ई. (MME) हयांजकडून शारीरिक तपासणीनुसार नोकरीस लायक असल्याचा दाखला सादर केल्याशिवाय ग्राह्य धरली जाणार नाही.

६. जर तो हे नेमणुकीचे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत हजर झाला नाही तर वरील आदेश रद्द केले आहेत असे समजण्यात येईल.

७. जर त्याने दुसरे लग्न केले असेल तर एक पेक्षा जास्त पत्नी हयात नसाव्यात

सदर जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

अर्जदाराची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार**

**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना अ (नियम ४)**

**प्रतिज्ञापत्र**

मी, श्री/श्रीमती ....................................... श्री. .......................................यांचा / यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय .......... वर्ष राहणार ............................................................. याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला .......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दि. २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

दिनांक:

ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी